MHDH050006232026

नियमीत फौजदारी खटला क्र.१४५/२०२६
शासन – विरुध्द – ज्ञानेश्वर झुलाल पिंपळे

<u>निशाणी क्रमांक १२ वर आदेश</u>
(पारित दिनांक २२ जूलै, २०२६)

. अर्जदार **ज्ञानेश्वर झुलाल पिंपळे (भिल)** यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या मालकीचा विवो कंपनीचा V40e5G मोबाईल ज्याचा आयएमईआय नं.८६५११००७५९५२६१५ आणि ८६५११००७५९५२६०७ हा ताब्यात मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

<u>अर्जातील कथन थोडक्यात खालील प्रमाणे</u>

२. उपरोक्त जप्त मोबाईल निजामपुर पोलीसांनी गु.र.क्र.३४/२०२६ मध्ये आरोपीच्या ताब्यातून जप्त केला असून सदर मोबाईल हा अर्जदाराच्या मालकी व कब्जेउपभोगातील आहे. सदर गुन्हयामध्ये तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. तसेच सदर जप्त मोबाईल हा अर्जदारास दैनंदिन कामासाठी लागत असते. तसेच, सदरचा जप्त मोबाईल हा पोलीस स्टेशनला पडून राहिल्यास त्याचे पार्ट खराब व निकामी होण्याची दाट शक्यता आहे. सदरचा जप्त मोबाईल हा अर्जदारास अटी शर्ती लादुन दिल्यास तो त्याचे पालन करेल. तसेच अर्जदार न्यायालयाच्या हुकूमाप्रमाणे योग्य त्या रकमेचा बंधपत्र देण्यास तयार आहे. सबब अर्ज मंजुर करावा, अशी त्याने विनंती केली.

३. सदरच्या अर्जावर सहायक सरकारी वकीलांनी खुलासा दाखल केला की,

प्रस्तुत खटल्यातील आरोपीने गंभीर व दखलपात्र व अजामीनपात्र स्वरुपाचा गुन्हा केलेला असून सदर गुन्हयातील जप्त केलेला मोबाईल हा महत्वाचा पुरावा आहे. सदर मोबाईल अर्जदारास परत केल्यास त्यात फेरफार करुन पुरावा नष्ट करण्याची दाट शक्यता आहे. जप्त मोबाईल अर्जदारास परत केल्यास तो मे.कोर्टात पुन्हा हजर करेल याची शाश्वती नाही. सबब, अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यात यावा ही विनंती.

४. तपासी अधिकारी यांनी **निशाणी १५** अन्वये त्यांचा खुलासा सादर केला की, अर्जदाराने गंभीर गुन्हा केला असून त्याच्या अंगझडतीत सदरचा मोबाईल मिळून आलेला आहे. अर्जदार यास सदर मोबाईल परत दिल्यास तो दुस–या गुन्हयात पुन्हा त्याचा वापर करु शकतो. तसेच, मोबाईलमध्ये फेरफार करु शकतो. तसेच, तो पुन्हा न्यायालयात सदर जप्त मोबाईल हजर करेल याची शाश्वती वाटत नाही. सबब, अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यात यावा ही विनंती.

५. अर्जदाराने त्याचे कथनाचे समर्थनार्थ, प्रस्तुतचे अर्जासोबत प्रतिज्ञापत्र सादर केले असून **निशाणी १४** च्या दस्तावेज वर्णन यादीसोबत आधारकार्डची पडताळीत प्रत आणि मोबाईल विकत घेतल्याचा पावतीची पडताळीत प्रत दाखल केलेली आहे. सदर दस्तांचे अवलोकन केले असता, सदरचा जप्त मोबाईल हा अर्जदाराच्या नावे असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरचा जप्त मोबाईल हा अर्जदाराच्या मालकी हक्काचे असल्याने त्यास देण्यास हरकत नाही.

६. दोन्ही बाजुच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. सदर प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकनार्थ असे दिसून येते की, सदर गुन्ह्यातील जप्त मोबाईल हा अर्जदाराच्या मालकीचा आहे. सदर मोबाईल कार्यालयात पडून राहिल्यास ऊन, धूळ आणि पाऊस यामुळे सदर मोबाईलचे स्पेअरपार्टस् व मशिन खराब होण्याची शक्यता नाकारता येत

नाही. या शिवाय अर्जदाराव्यतिरीक्त सदर मोबाईलची कोणीही मागणी केलेली नाही. तसेच सहायक सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तुत अर्जावर आक्षेप घेतलेला आहे. परंतु अर्जदार हा जप्त मोाबाईलचा मालक असल्याचे दाखल दस्तावेजांवरुन दिसून येते.

७. या ठिकाणी असे नमुद करावेसे वाटते की, मा. सर्वोच्च न्यायालयाने ***AIR 2003 SC 638 Sundarbhai Ambalal Desai Vs. State of Gujarat***, या प्रकरणामध्ये दिलेल्या निर्देशानुसार वाहनावर मालकी हक्क शाबीत झाल्यास वाहन अर्जदारास देण्यात सांगितले असल्याने अर्जदार सदरचा जप्त वाहनाचा ताबा मिळण्यास पात्र आहे. या सर्व बाबींचा सारासार विचार करता, गुन्ह्यातील जप्त वाहन हे काही अटी व शर्तींच्या सुपूर्दनाम्यावर अर्जदाराचे ताब्यात देणे मला वावगे वाटत नाही, म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा **निशाणी १२** वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. जप्त म विवो कंपनीचा V40e5G मोबाईल ज्याचा आयएमईआय नं.८६५११००७५९५२६१५ आणि ८६५११००७५९५२६०७ हा रक्कम रुपये १,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख मात्र) चे बंधपत्र लिहून घेऊन खालील अटी व शर्तींनुसार अर्जदार **ज्ञानेश्वर झुलाल पिंपळे (भिल)** यांच्या ताब्यात द्यावा.

३. **अ.** अर्जदाराने सदर मोबाईलमध्ये कोणतेही बदल, त्याचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण तसेच, विक्री करु नये अथवा इतर कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावू नये.

**ब.** तपासी अधिकारी यांनी सदर मोबाईलचे दोन रंगीत छायाचित्र काढून ते दोषारोपपत्रसोबत जोडावे.

**क.** न्यायालय आदेश देईल त्या-त्या वेळी अर्जदाराने सदरचा मोबाईल न्यायालयासमक्ष हजर करावा.

**ड.** सदर मोबाईलबाबत न्यायालयाने दिलेल्या प्रत्येक आदेशाचे अर्जदाराने काटेकोरपणे पालन करावे.

**इ.** सदर मोबाईल अन्य कोणत्याही गुन्ह्यात वापरण्याचे नाही.

**४.** वरील अटी व शर्तींचा अर्जदाराकडून भंग झाल्यास त्याचे बंधपत्र जप्त करण्यात येईल व त्याचेकडून बंधपत्रातील रक्कम वसूल करण्यात येईल.

**५.** सदर आदेशाची प्रत मुळ खटल्या सोबत ठेवावी.

**६.** याबाबत संबंधित पोलीस ठाण्यात यादी पाठवावी.

MUGDHA MUKUND GANGURDE

Digitally signed by MUGDHA MUKUND GANGURDE
Date: 2026.07.22 15:01:55 +0530

साक्री.
दिनांक : २२.०७.२०२६.

**(मुग्धा एम. गांगुर्डे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, साक्री**